(मिलिंद चव्हाण)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) /महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.-९५/२०२०

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/१६२५
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ०८
दिनांक : १०.०६.२०२०

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय** :- महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागु करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या अनुषंगाने राज्यात रा.प. महामंडळाच्या कामकाजासाठी ईमेल तसेच व्हाट्सअॅपचा वापर ग्राह्य धरण्याबाबत.

******

उपरोक्त विषयांकित शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.समय-२०२०/प्र.क्र.३५/१८ (र.व का.) दिनांक ०५.०६.२०२० ची प्रत माहीतीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

सही/-
(शेखर चन्हाण) १०/६
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

**सोबत** :- वरीलप्रमाणे

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) /महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/(प्रशासन)/(मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ)/ (नियोजन)/(समन्वय)/ (घटकसंवर्ग).

Scanned with CamScanner

महाराष्ट्र राज्यात कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉक डाऊनच्या अनुषंगाने राज्यात शासकीय कामकाजासाठी ईमेल तसेच व्हॉट्सअॅपचा वापर ग्राह्य धरण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : समय २०२०/प्र.क्र.३५/१८(र.व का.)
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०००३२
दिनांक : ५ जून, २०२०

वाचा:- :

१. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८ (र.व का.), दिनांक १८ एप्रिल, २०२०,
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८ (र.व का.), दिनांक २२ एप्रिल, २०२०,
३. केंद्रशासनाच्या गृह मंत्रालयाची अधिसूचना क्र. ४०-३/२०२०-डीएम-आय-(ए) दि. १ मे, २०२०,
४. शासन अधिसूचना, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनवर्सन, क्रमांक : डीएमयू २०२० / सी आर ९२ / डीआयएसएम-१, दिनांक २ मे, २०२०.
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : समय-२०२० / प्र. क्र. ३५ /१८ (र.व का.), दिनांक ४ मे, २०२०,

शासन परिपत्रक :-

कोरोना विषाणूंचा (COVID-१९) प्रसार राज्य शासकीय कार्यालयांमध्ये होऊ नये, तसेच राज्यातील अधिकारी / कर्मचारी यांना त्यांचा संसर्ग होऊ नये म्हणून विविध प्रतिबंधात्मक उपाय योजना राबविण्याच्या दृष्टीने या विभागाच्या संदर्भ क्रमांक १, २ व ५ येथील शासन निर्णयान्वये विविध सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. लॉकडाऊनच्या कालावधीत राज्य शासकीय कार्यालयातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती नियंत्रित करण्यात येत आहे. तसेच भविष्यातही अशा प्रकारची परिस्थिती लक्षात घेता शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी त्यांचे घरातच राहूनही कार्यालयीन आवश्यकतेनुसार व तातडीनुसार शासकीय कामकाजाचा निपटारा करणेसाठी उपाययोजना करणे आवश्यक आहे. यासाठी शासकीय ईमेल (जसे एनआयसी मेल, इ.), त्यांच्या नेहमीच्या वापरातील अन्य ईमेल तसेच व्हॉट्सअॅपचा वापर शासकीय कामकाजासाठी तसेच संबंधितांना सूचना / आदेश देण्यासाठी करणे ग्राह्य धरण्यात येईल.

Scanned with CamScanner

Scanned with CamScanner

३. सबब सर्व राज्य शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत :-

अ) प्रत्येक अधिकारी / कर्मचारी यांनी, त्यांचे शासकीय ई-मेल आयडी / त्यांच्या नेहमीच्या वापरातील अन्य ई-मेल आयडी तसेच एस.एम.एस / व्हॉट्सअॅपची सुविधा असलेला मोबाईल क्रमांक, त्यांचे कार्यालय प्रमुखांस उपलब्ध करून द्यावा.

ब) शासकीय कामकाजासाठी शासकीय ई-मेल आयडी / त्यांच्या नेहमीच्या वापरातील अन्य ईमेल आयडी तसेच व्हॉट्सअॅपचा वापर करून त्यांच्या कामाचा जास्तीत जास्त निपटारा करावा.

क) प्रस्ताव ई-मेलद्वारे फॉरवर्ड केल्यानंतर त्याबाबतची सूचना लगेचच संबंधितांस एस.एम.एस (SMS)/ व्हॉट्सअॅपवरून (Whatsapp) देण्याबाबत दक्षता घेण्यात यावी.

ड) उक्त पद्धतीने वरिष्ठांकडून प्राप्त सूचनेनुसार ईमेलद्वारे अंतिम मान्यतेसाठी सादर केलेला प्रस्ताव (फॉरवर्ड केलेला प्रस्ताव ) हा, तो सादर करणारे व अंतिम मान्यता देणारे या दोन्ही स्तरामधील अधिकाऱ्यांनी पाहिला, तपासला व मान्य केला आहे, असे गृहित धरण्यात येईल.

प्रस्ताव तयार करणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांनी प्रस्ताव ई-मेलद्वारे अंतिमत: फॉरवर्ड करण्यापूर्वी तो सर्व संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून फॉरवर्ड करावा व त्याची प्रत (C.C. मध्ये) सर्व संबंधित अधिकाऱ्यांना चिन्हांकित करावी.

४. तरी सर्व मंत्रालयीन अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव तसेच मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख तसेच कार्यालय प्रमुख यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी सदर सूचना त्यांचे नियंत्रणाखालील अधिकारी / कर्मचारी यांचे निदर्शनास आणाव्यात.

५. उक्त सूचना पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

६. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२००६०५१४०३१९१९०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Rajesh Bhaskar Gaikwad

(रा. भा. गायकवाड)
कार्यासन अधिकारी

प्रत :

Scanned with CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. १६/२०२०

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ ९७०७९
कर्मचारीवर्ग खाते,
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४०० ००८.
दिनांक : १८ जून, २०२०.

महाव्यवस्थापक (अपील) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/(समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र. ३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी/ नांदेड/अमरावती
/अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय : महामंडळाच्या कर्मचा-यांना रा.प. बसमधून प्रवास करण्यासाठी मिळणा-या मोफत पास संदर्भात.**

----

रा.प.महामंडळाच्या कर्मचा-यांना व त्यांच्या कुटुंबियांना रा.प.बसने प्रवास करण्यासाठी येणा-या मोफत पासासंदर्भात वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि, सदर मोफत प्रवास पासाचा गैरवापर न होण्याच्या दृष्टीने खालील बाबींची पडताळणी करण्यात यावी.

१. कर्मचा-यांकडून मोफत प्रवास पास गहाळ झाल्यास यासंदर्भात कर्मचा-याने पोलिसांत तक्रार करणे आवश्यक आहे. याबाबतचा आस्थापना आदेश पारित न करताच सदर कर्मचा-यास मोफत पास दिला गेला आहे का?

२. कर्मचा-यांवर अवलंबून नसलेल्या कुटुंबातील सदस्यास मोफत पास देण्यात आला आहे का? (उदा. लग्न झालेल्या किंवा नोकरीस असलेल्या मुलास/मुलीस)

३. दिनांकामध्ये, नावामध्ये खाडाखोड करुन मोफत प्रवास पासाचा गैरवापर करण्यात आला आहे का?

४. एखादया कर्मचा-यास वर्षातून दोन पेक्षा अधिक वेळा मोफत प्रवास पास दिला गेला आहे का?

उपरोक्त बाबींची काटेकोरपणे पडताळणी करण्यात यावी व अशाप्रकारे मोफत पासाबाबत गैरवापर केलेला आढळल्यास संबंधितांवर शिस्त व आवेदन कार्यपध्दतीअंतर्गत त्वरित कारवाई करण्यात यावी व अशा प्रकारच्या चुकांची पुनरावृत्ती होणार नाही याबाबत योग्य दक्षता घेण्यात यावी.

(शैलेंद्र चव्हाण)
महाव्यवस्थापक (क.व.औ.सं)

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखापरीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा.अध्यक्षांचे स्वीय सहायक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन )सहायक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्य संवर्ग)/ (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटक संवर्ग)/ (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

Scanned with CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.-१७ /२०२०

क्रमांक:राप/कर्मवर्ग/आस्था/४०८-ई(१)/ १७८०
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ०८
दिनांक : १९.०६.२०२०

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/ (समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र. ३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय :- मर्यादित उपस्थितीच्या काळात रा.प.कार्यालयातील कर्मचा-यांची उपस्थिती सुनिश्चित करणे व वेतन आहरित करण्याबाबत.

संदर्भ :- १) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग परिपत्रक क्र. संकिर्ण १०२०२०/प्र.क्र.०१/ सचिव (व्यय), दि.०५.०६.२०२०.

*****

रा.प.महामंडळ हे "सार्वजनिक उपयुक्तता सेवा" म्हणुन जाहीर करण्यात आले आहे. त्यामुळे, संबधीत महामंडळातील तातडीचे व महत्वाचे कामकाज चालु राहण्याच्या दृष्टीने संबंधित खातेप्रमुख/ विभाग प्रमुख /घटक प्रमुख यांनी त्यांचे नियंत्रणाखालील सर्व अधिकारी / कर्मचारी यांची उपस्थिती निश्चित केलेली आहे. त्यानुसार मर्यादित संख्येत अधिकारी व कर्मचारी यांच्या उपस्थितीत रा.प.महामंडळाचे कामकाज सुरु आहे. तथापि, असे निदर्शनास आले आहे की काही अधिकारी/ कर्मचारी लॉकडाऊनच्या कालावधी दरम्यान पुर्वपरवानगी शिवाय गैरहजर आहेत. तसेच, मुख्यालय सोडुन अन्य गावी गेलेले आहे. त्यामुळे कार्यालयात उपस्थित राहणा-या कर्मचा-यांवर अतिरीक्त कामाचा अनाठायी ताण येत आहे.

रा.प.महामंडळातील कर्मचा-यांनी महामंडळाच्या कामाप्रती सर्वोतोपरी निष्ठा ठेवणे अनिवार्य आहे. तसेच, कार्यालयातील कामाचे कर्मचारी निहाय समन्यायी वाटप होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने शासकीय अधिकारी/ कर्मचा-यांच्या प्रमाणेच रा.प.महामंडळातील कर्मचा-यांची उपस्थिती सुनिश्चित करणे व वेतन आहरित करण्याबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१) रा.प.आगार, कार्यशाळा, विभागीय कार्यशाळा यांचा प्रवाशी वाहतूकीशी थेट संबंध येतो. त्यामुळे तेथे काम करणा-या चालक, वाहक व कार्यशाळा इ. कर्मचा-यांना कामाच्या नियोजनानुसार व आवश्यकतेनुसार त्यांच्या उपस्थितीबाबत वाहतूक खात्यामार्फत व यंत्र अभियांत्रिकी खात्यामार्फत स्वतंत्र सुचना निर्गमित करण्यात येतील.

D:\GAD\Circular\Gen Circular-2020.docx



Scanned with CamScanner

२) प्रत्येक विभाग व घटक यांनी आपले अधिनस्त सर्व कर्मचारी व अधिकारी बाबत रोस्टर तयार करावे. ज्यामध्ये प्रत्येक अधिकारी व कर्मचारी आठवडयात किमान एक दिवस कार्यालयात हजर राहतील. पुर्व मंजुर अर्जित व तत्सम तसेच वैद्यकीय कारणास्तव रजेवर असलेल्या कर्मचा-यांव्यतिरीक्त उर्वरित कर्मचाऱ्यांपैकी प्रत्येक कर्मचा-याला आठवडयातुन किमान एक दिवस कार्यालयात हजर राहणे अनिवार्य राहील. सदर कर्मचा-याने उपस्थित रहावयाच्या दिनांकाबाबत खाते प्रमुख / घटक प्रमुख / विभाग प्रमुख हे उपस्थितीबाबत आदेश प्रसारीत करतील व त्याची दप्तरी नोंद ठेवतील.

३) सर्व अधिकारी / कर्मचारी यांना नेमुन दिलेल्या उपस्थितीच्या दिनांकास कार्यालयात उपस्थितीत राहणे अनिवार्य राहील. लॉकडऊनच्या कालावधित जे अधिकारी /कर्मचारी यांनी विनापरवानगी मुख्यालय सोडले आहे त्यांच्या विरुध्द शिस्त व आवेदन कार्यपध्दतीनुसार संबंधित सक्षम प्राधिकारी यांनी शिस्तभंगाची कारवाई करावी.

४) कर्मचारी /अधिकारी यांना रोस्टर प्रमाणे उपस्थित राहण्याबाबत आदेशित केले असेल व आठवडयात कर्मचारी / अधिका-यांची ज्या दिवशी उपस्थिती लावण्यात आली असेल, त्या उपस्थितीच्या दिवशी ते कर्मचारी /अधिकारी उपस्थित राहिल्यासच त्यास संपूर्ण आठवडयाचे वेतन अदा करावे.

५) ज्या कर्मचारी / अधिका-यांना एका पेक्षा जास्त दिवस उपस्थित राहण्याबाबत आदेशित केले आहे, तथापि आदेशित केलेल्या दिवसांना ते अनुपस्थित राहिल्यास सदर कर्मचारी / अधिका-यांना फक्त त्या आठवडयातील उपस्थित दिवसांचेच वेतन अदा करावे. उर्वरीत दिवसांची त्यांची त्या आठवडयातील अनुपस्थिती ग्राहय धरुन सदर अनुपस्थितीबाबत सक्षम प्राधिका-यानी त्यांची अर्जित / वैद्यकीय / परिवर्तीत किंवा यथास्थिती विनावेतन रजा म्हणून नियमित करावी.

६) आदेशित दिवसांना कर्मचारी / अधिकारी अनुपस्थित राहिल्यास सदर कर्मचा-याची/ अधिका-याची त्या आठवडयाची अनुपस्थिती अर्जित / वैद्यकीय / परिवर्तीत किंवा यथास्थिती विनावेतन रजा म्हणून नियमित करण्यात यावी.

७) सदर सुचना परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अमलांत येतील.

सदरचे परिपत्रक हे लेखा खात्याच्या सहमतीने व उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

वर नमुद केलेल्या सूचनांची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात यावी.

(शैलेंद्र चव्हाण) ७/५

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) /महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन) / सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

D:\GAD\Circular\Genl Circular 2020.docx

Scanned with CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.१८/२०२०

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/१८७५
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८
दिनांक : ९.०७.२०२०

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/ (समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र. ३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प.दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय : शासन व्यवहारात राजभाषा मराठीचा सक्षमपणे वापर करणेबाबत.

संदर्भ: १. परिपत्रक क्र. १०/२०१७ क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/१५४१ दिनांक २० मार्च २०१७
२. परिपत्रक क्र. २३/२०१८ क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/३२८२ दिनांक ०२ जून २०१८
३. परिपत्रक क्र. ३६/२०१८ क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/५३१५ दिनांक १४ सप्टेंबर २०१८
४. शासन परिपत्रक, मराठी भाषा विभाग, क्र.मभावा-२०१९/प्र.क्र.२२/भाषा-२ दि.२९.०६.२०२०

महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यानंतर शासनाने मराठीतून राज्यकारभार करण्याचे आपले धोरण जाहीर केले आहे. सदर धोरणानुसार दिनांक २६ जानेवारी १९६५ पासून मराठी ही राज्याची राजभाषा म्हणून घोषित करण्यात आली. महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ मधील तरतुदीनुसार दिनांक १ मे १९६६ पासून वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करणे <u>बंधनकारक</u> करण्यात आले आहे. त्यानुसार वर्जित प्रयोजने वगळता सर्व कामकाज मराठीतून करण्यासाठी यापूर्वी वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि, रा.प. महामंडळातील कार्यालयीन कामकाज १०० टक्के मराठीतून होत नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. शासनाच्या धोरणाची पायमल्ली होणे ही बाब अत्यंत आक्षेपार्ह आहे.

२. **शासन परिपत्रक, मराठी भाषा विभाग, क्र.मभावा-२०१९/प्र.क्र.२२/भाषा-२ दि.२९.०६.२०२०** अन्वये, वर्जित प्रयोजने वगळता इतर बाबतीत संयुक्तीक कारण नसताना ते राजभाषा मराठीचा वापर करण्यास टाळाटाळ करणा-या अधिकारी व कर्मचारी यांचे संदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या १८.०७.१९८६ च्या निणर्यान्वये, अनुक्रमे लेखी ताकीद देणे, गोपनिय अहवालात नोंद घेणे, ठपका ठेवणे व एका वर्षाकरीता वार्षिक वेतनवाढ रोखणे इत्यादी कारवाई करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

..२..

Scanned with CamScanner
Scanned with CamScanner

३. शासन परिपत्रकाच्या अनुषंगाने रा.प.महामंडळात मराठी भाषेचा वापर करण्यास टाळाटाळ करणा-या अधिकारी / कर्मचा-यांच्या बाबत खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१. राज्य परिवहन महामंडळात कार्यालयीन पातळीवर वर्जित प्रयोजने वगळता राजभाषा मराठीचा वापर १०० टक्के करण्याबाबत काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात यावी

२. वर्जित प्रयोजने वगळता इतर बाबतीत संयुक्तीक कारण नसताना ते राजभाषा मराठीचा वापर करण्यास टाळाटाळ करणा-या अधिकारी व कर्मचारी यांचे संदर्भात कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१०/२०१७ क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/१५४१ दिनांक २०.०३.२०१७ अन्वये, शिस्तभंगाची कठोरतम कारवाई करण्याच्या सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्याअनुषंगाने अनुक्रमे लेखी ताकीद देणे,गोपनिय अहवालात नोंद घेणे,ठपका ठेवणे व एका वर्षाकरीता वार्षिक वेतनवाढ रोखणे इत्यादी कारवाई करण्यात यावी.

४. या परिपत्रकातील सुचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी विभाग/ घटक प्रमुखांची आहे. सदर परिपत्रक कार्यालयाच्या सुचना फलकावर ठळकपणे प्रदर्शित करावे तसेच आपल्या अधिनस्त असणा-या सर्व कर्मचा-यांच्या स्वाक्ष-या घेऊन त्याची नोंद आपल्या दफ्तरी ठेवण्यात यावी.

सदरचे परिपत्रक हे मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सोबत - संदर्भित शासन परिपत्रक

(शैलेंद्र चव्हाण)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) /महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन) / सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/(मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/ (मनुष्यबळ नियोजन/ समन्वय)/ (घटकसंवर्ग).

Scanned with CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. १९/२०२०

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ २०२९
म.रा.मा.प.महामंडळ,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८.
दिनांक: १७ जुलै, २०२०.

उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई/ ठाणे /पालघर/रायगड/रत्नागिरी / सिंधुदुर्ग / पुणे / सातारा / सांगली/कोल्हापूर/सोलापूर /
नाशिक / जळगाव / धुळे / अहमदनगर/औरंगाबाद/जालना/लातूर / बीड/ उस्मानाबाद/परभणी/नांदेड
अमरावती/ अकोला/बुलडाणा/यवतमाळ/नागपूर/वर्धा/ भंडारा/चंद्रपूर/गडचिरोली.

विषय: सन २०२०-२१करिता अंदाजपत्रकातील घरबांधणी /
स्कुटर/ मोटार सायकल/लूना/संगणक अग्रीम उपलब्ध करुन देणेबाबत.

संदर्भ: १)सा.स्था.आ.क्र.१२१७ सन २०१६ दि.१८.०३.२०१६.
२)लेखा खात्याचे पत्र क्र.राप/लेखा/अंबवि/३१/२४७० दि.२४.०९.२०१९

-----------

सद्य परिस्थितीत कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे रा.प.महामंडळाच्या आर्थिक स्थितीवर झालेला परिणाम व महामंडळाची सद्य आर्थिक स्थिती विचारात घेता सन २०२०-२१करिता अंदाजपत्रकातील घरबांधणी / स्कुटर/ मोटार सायकल/लूना/संगणक अग्रीम उपलब्ध करुन देण्याकरिता निधीचे रा.प.विभागांना वितरण करणेबाबत सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिलेली नाही.

सदर सूचना लेखा खात्याच्या सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहेत.

(शैलेंद्र चव्हाण) १७/७
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

प्रत: माहितीसाठी सादर रवाना.

वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (भां.व ख.) / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (संवामंडळ) / सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय) यांचे माहितीस्तव.

L:\Aarti_Default\Notes\HBA Note-circular.docx

Scanned with CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.२०/२०२०

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ २०३०
कर्मचारीवर्ग खाते,
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८.
दिनांक : १६ जुलै, २०२०.

महाव्यवस्थापक (अपील) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी/ नांदेड/
अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: अपहार प्रवण असलेल्या वाहकांच्या बदलीबाबत.**

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१४/२०२० दि.०९.०६.२०२० अन्वये कोवीड -१९ महामारीच्या अनुषंगाने चालू वित्तीय वर्षात कोणत्याही संवर्गातील अधिकारी / कर्मचारी यांची बदली करु नये अशा सूचना आहेत.

२. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.२/२०१७ दि.०१.०२.२०१७ व परिपत्रक क्र.१७/२०१९ दि.०२.०४.२०१९ अन्वये अपहार प्रवण वाहकांच्या प्रवृत्तीला आळा घालण्यासाठी त्यांनी केलेल्या अपहाराच्या प्रकारानुसार तृतीय व चतुर्थ अपहार प्रकरणी बदलीची कार्यवाही करावी किंवा कसे ? या संदर्भात विभागांमार्फत करण्यात आलेल्या विचारणेच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

३. परिपत्रक क्र.२/२०१७ दि.०१.०२.२०१७ मध्ये नमूद केलेल्या अपहाराच्या तृतीय प्रमाद प्रकरणी संबंधित विभागातील अन्य आगारामध्ये बदली करण्याचे विभाग नियंत्रक यांना नियुक्ती प्राधिकारी या नात्याने असलेले अधिकार तसेच चतुर्थ व त्यानंतरच्या प्रमाद प्रकरणी सदर कर्मचा-याची संबंधित प्रदेशातील जवळच्या विभागामध्ये बदली करण्याचे संबंधित उप महाव्यवस्थापकांस परिपत्रक क्र.१७/२०१९ अन्वये असलेले अधिकार यामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

१६/७
(शैलेंद्र चव्हाण) १६/७
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

Scanned with CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. २९ /२०२०

क्रमांक:राप/कर्मवर्ग/आस्था/४०८-ई(१)/2962
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ०८
दिनांक : ०५ .०८.२०२०

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय:-** कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील बदल्यांसंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.

**संदर्भ :-** कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१४/२०२०, क्र.राप/आस्था /४०८ई(१)/१७०७ दि.०९.०६.२०२०

*****

शासन निर्णय,वित्त विभाग क्र. अर्थसं-२०२०/प्र.क्र.६५/अर्थ-३ दिनांक ०४.०५.२०२० अन्वये,शासनाने बदल्यासंदर्भात सुचना प्रसारीत करण्यात आल्या होत्या. त्याधर्तीवर संदर्भित परिपत्रकान्वये चालू वित्तीय वर्षात कोणत्याही संवर्गातील अधिकारी /कर्मचारी यांची बदली करण्यात येउ नये,अशा सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

तथापि,शासन निर्णय,सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.-३०/कार्या१२ दि.०७.०७.२०२० अन्वये, बदल्यासंदर्भात नव्याने केलेल्या सुचना विचारात घेउन खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

१. कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर दि.२२.०३.२०२० पासून शासनाने लॉकडाउन जाहीर केले होते. या कालावधीत रा.प.महामंडळाची प्रवाशी वाहतूक सेवा मोठया प्रमाणात बंद असल्याने तसेच सध्याच्या अनलॉकच्या कालावधीतही प्रवाशी उत्पन्न कमी असल्याने **महामंडळाची आर्थिक स्थिती समाधानकारक नसल्याने प्रशासकीय बदल्या करण्यात येऊ नये.**

२. फक्त विनंती बदल्या करावयाच्या असल्यास अशा बदल्या,बदली अधिनियम तरतूदी विचारात घेऊन दि.१०.०८.२०२० पर्यन्त करण्यात याव्यात.

३. चालू वित्तीय वर्षात करावयाच्या **विनंती बदल्या** त्या त्या संवर्गातील एकूण कार्यरत पदांच्या १५ टक्के एवढया मर्यादेत दि.१०.०८.२०२० पर्यंत करण्यात याव्यात.

वर नमूद केलेल्या सुचनांची काटेकोरपणे अमंलबजावणी करण्यात यावी.

सदरचे परिपत्रक मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने प्रसारीत करण्यात येत आहे.

(अ.आ.फेळणीकर)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)



D:\GAD\Circular\Gen Circular 2020 docx

Scanned with CamScanner

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) / महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग) / (मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

Scanned with CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. 22/२०२०

[illegible] २७६४
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ. आनंदराव नायर मार्ग, मुंबई ०८.
दिनांक : 06.8.२०२०

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ, मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय:-कोरोना विषाणु प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये रा.प.महामंडळातील गर्भवती महिला तसेच व्याधीग्रस्त अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयातील उपस्थितीबाबत सूट मिळण्याबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना.

*****

उपरोक्त विषयाबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.समय२०२०/प्र.क्र.४१/१८ (र.वका.) दिनांक २३ जुलै २०२० ची प्रत माहीतीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

सोबत - वरीलप्रमाणे

(अ.आ.फळणीकर)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं) तथा
वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) /महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

Scanned with CamScanner

महाराष्ट्र राज्यातील कोरोना विषाणू प्रसारावरील प्रतिबंधात्मक उपाय म्हणून लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या कालावधीमध्ये गर्भवती महिला तसेच व्याधिग्रस्त अधिकारी/ कर्मचारी यांच्या शासकीय कार्यालयातील उपस्थितीबाबत स्पष्टीकरणात्मक सूचना.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक : समय २०२०/प्र.क्र.४१/१८(र.वका.)
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०००३२
दिनांक : २३ जुलै, २०२०

वाचा:- :

१. केंद्र शासनाच्या लोकतक्रार, पेन्शन, कार्मिक व प्रशिक्षण मंत्रालयाचे क्र.११०१३/९/२०१४-Estt-(A III) दिनांक १९ मे, २०२० चे आदेश.

२. शासन आदेश, आपत्ती व्यवस्थापन व मदत व पुनवर्सन, क्रमांक :डीएमयू २०२०/ सीआर ९२/डीआयएसएम-१, दिनांक २९ जून, २०२०.

**शासन निर्णय:-**

कोरोना विषाणूंचा (COVID-१९) प्रसार राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये होऊ नये, तसेच राज्यातील अधिकारी / कर्मचारी यांना त्याचा संसर्ग होऊ नये म्हणून विविध प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या दृष्टीने शासकीय कार्यालयातील उपस्थिती रोटेशन पद्धतीने नियंत्रित करण्याबाबत वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

२. गर्भवती महिला तसेच व्याधिग्रस्त शासकीय अधिकारी / कर्मचारी हे कोरोना विषाणूंच्या संसर्गास सहजपणे बळी पडू शकत असल्याने ज्या शासकीय कार्यालयातील उपस्थिती रोटेशन पद्धतीने नियंत्रित करण्यात आलेली आहे, तेथे गर्भवती महिला तसेच व्याधिग्रस्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना वैद्यकीय प्रमाणपत्र सादर केल्यानंतर कार्यालयात उपस्थित राहण्यापासून शक्यतोवर सूट देण्यात यावी, असे केंद्र शासनाच्या दिनांक १९ मे, २०२० च्या कार्यालयीन आदेशान्वये सूचित करण्यात आलेले आहे. केंद्र शासनाच्या आदेशास अनुसरुन सर्व मंत्रालयीन तसेच मंत्रालयाच्या नियंत्रणाखालील विभाग / कार्यालयांमधील गर्भवती महिला तसेच व्याधिग्रस्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

३. सबब शासनाने असा निर्णय घेतला आहे की, गर्भवती महिला तसेच अवयव प्रत्यारोपण केलेले, केमो थेरपी, इम्युनोसप्रेसिव्ह थेरपी घेत असलेले शासकीय अधिकारी कर्मचारी हे कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळण्यास पात्र असतील. त्यासाठी त्यांनी वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

Scanned with CamScanner

४. वरील परिच्छेद-३ संदर्भात संबंधित मंत्रालयीन विभाग / कार्यालये यांना अडचणी / शंका असल्यास त्यांनी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सल्ल्याने उचित निर्णय घ्यावा.

५. ज्या क्षेत्रातील शासकीय कार्यालयामध्ये शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती रोटेशनने नियंत्रित करण्यात आलेली आहे, अशा कार्यालयांमधील गर्भवती महिला तसेच व्याधिग्रस्त अधिकारी / कर्मचारी यांना परिच्छेद-३ प्रमाणे कार्यालयामध्ये उपस्थित राहण्यापासून सूट देता येईल. तथापि अन्य कार्यालयांमध्ये त्यांची उपस्थिती अनिवार्य राहील.

६. ज्या अधिकारी / कर्मचारी यांना कार्यालयात उपस्थित राहण्यापासून सूट मिळालेली आहे, त्यांनी कार्यालयातील त्यांचेकडील महत्वाच्या व तातडीच्या शासकीय कामकाजाचा निपटारा होण्याच्या दृष्टीने त्यांचे मोबाईल क्रमांक तसेच ई-मेल आयडी कार्यालयास उपलब्ध करुन दयावेत व दिलेल्या मोबाईल क्रमांकावर उपलब्ध रहावे.

७. सदरचे सूचना पुढील आदेशापर्यन्त लागू राहतील.

८. हा शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सल्ल्याने निर्गमित करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्याwww.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र. २०२००७२३१३१५४६०४०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Rajesh Bhaskar Gaikwad

(रा. भा. गायकवाड)
कार्यासन अधिकारी

प्रत :

१. मा.राज्यपाल यांचे सचिव (५ प्रती),
२. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
३. मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. सर्व सन्माननीय विधानसभा, विधानपरिषद व संसद सदस्य,
६. मा. मुख्य मंत्र्यांचे प्रधान सचिव(५ प्रती), मंत्रालय, मुंबई ४०००३२.



Scanned with CamScanner

परिपत्रक क्र. २३/२०२०

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ २३८४
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८.
दिनांक ०४/९ ऑगस्ट, २०२०.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय,पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: शासनमान्य खाजगी रुग्णालयांना C.G.H.S च्या दराने रा.प.महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्याबाबत.**
**संदर्भ: परिपत्रक क्र.९/८७ जावक क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/२२५८ दिनांक २३.०४.१९८७.**

संदर्भाधिन परिपत्रकाच्या भाग-२, अंतर्गत येणा-या गंभीर आजारांवरील उपचाराकरिता येणा-या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत खालील नमूद खाजगी रूग्णालयास त्याच्या नावासमोर दर्शविलेल्या आजारावरील उपचार करण्यासाठी पुणे शहराकरिता असलेल्या C.G.H.S NON N.A.B.H. च्या दराने रा.प. महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्यास सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिली आहे.

| क्र. | रूग्णालयाचे नांव व पत्ता | आजाराचे स्वरूप | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | अथायु मल्टीस्पेशालिटी हॉस्पीटल, कोल्हापूर,आर.एस.नं.४४/१ मु.पो.उजलाईवाडी, नॅशनल हायवे नं-४ ता-करवीर, कोल्हापूर-४१६००४. | हृदय विकारावरील उपचार व शस्त्रक्रिया | ०२३१-२६७७६०० ०२३१-२६७७६०१ www.athaayuhospital.com info@athaayuhospital.com |

उपरोक्त रुग्णालयात रा.प.कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियानी उपचार करुन घेतल्यास त्यांना सदर रुग्णालयाने संमती दर्शविलेल्या C.G.H.S (Central Government Health Scheme) NON N.A.B.H. च्या पुणे शहराकरिता असलेल्या प्रचलित दराप्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करावी. C.G.H.S दर (cghs.gov.in ) या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

सदर रूग्णालयाची वैद्यकीय देयके या कार्यालयाकडे पाठविताना रूग्णालयाने आकारलेले दर पुणे शहराकरीता असलेल्या C.G.H.S. NON N.A.B.H. च्या दरपत्रकानुसार खात्री करावी. तसेच सदर आजारावरील घेतलेल्या इतर उपचारांची दर आकारणी पुणे शहराकरीता असलेल्या C.G.H.S. NON N.A.B.H. च्या दरानुसार आकारले असल्याबाबत खात्री करुन व संबंधित मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांचेकडून देयकावर शिफारस घेऊन तसा उल्लेख वैद्यकीय देयकाच्या प्रस्तावामध्ये/नस्तीमध्ये करण्यात यावा. वैद्यकीय देयके C.G.H.S. दरानुसार लेखापरिक्षण करुन तसे देयकांवर प्रमाणीत करण्यात यावे व देयके या कार्यालयाकडे पाठविण्यात यावीत. याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

सदर परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे सहमतीने प्रसारीत करण्यात येत असून परिपत्रक प्रसारीत केलेल्या दिनांकापासून लागू राहील. सदर परिपत्रक सर्व अधिकारी / कर्मचारी व मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांच्या निदर्शनास येईल अशा पध्दतीने आपल्या स्तरावर कार्यवाही करावी.

(राहुल तोरो)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

Scanned by CamScanner

प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

Scanned by CamScanner

परिपत्रक क्र. २४/२०२०

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ २४३७
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८.
दिनांक: ७ ऑगस्ट, २०२०.
सप्टेंबर

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय,पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: शासनमान्य खाजगी रुग्णालयांना CGHS च्या दराने रा.प.महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्याबाबत.**

**संदर्भ: परिपत्रक क्र.९/८७ जावक क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/२२५८ दिनांक २३.०४.१९८७.**

संदर्भाधिन परिपत्रकाच्या भाग-२, अंतर्गत येणा-या गंभीर आजारांवरील उपचाराकरिता येणा-या वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीबाबत खालील नमूद खाजगी रूग्णालयास त्याच्या नावासमोर दर्शविलेल्या आजारावरील उपचार करण्यासाठी मुंबई शहराकरिता असलेल्या C.G.H.S. च्या दराने रा.प. महामंडळाच्या नामिकेवर (Panel) घेण्यास सक्षम प्राधिकारी यांनी मान्यता दिली आहे.

| क्र. | रूग्णालयाचे नांव व पत्ता | आजाराचे स्वरूप | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | आत्मा मलिक हॉस्पीटल, कोकमठाण, पोस्ट-कोकमठाण, शिर्डी कोपरगाव रोड,तालुका-कोपरगाव, जिल्हा अहमदनगर-४२३६०१. | हृदय विकारावरील उपचार व शस्त्रक्रिया | ७३०४७५५६५५<br>PRO -७०३०१४०९५४/<br>७०३०१४०९५७/<br>७०३०१४०९५२/<br>everhospital2019@gmail.com |

उपरोक्त रुग्णालयात रा.प.कर्मचारी व त्यांच्या कुटुंबियानी उपचार करुन घेतल्यास त्यांना सदर रुग्णालयाने संमती दर्शविलेल्या C.G.H.S (Central Government Health Scheme) च्या मुंबई शहराकरिता असलेल्या प्रचलित दराप्रमाणे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करावी. C.G.H.S. दर (cghs.gov.in ) या अधिकृत संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

सदर रूग्णालयाची वैद्यकीय देयके या कार्यालयाकडे पाठविताना रूग्णालयाने आकारलेले दर मुंबई शहराकरीता असलेल्या C.G.H.S.च्या दरपत्रकानुसार खात्री करावी. तसेच सदर आजारावरील घेतलेल्या इतर उपचारांची दर आकारणी मुंबई शहराकरीता असलेल्या C.G.H.S च्या दरानुसार आकारले असल्याबाबत खात्री करुन व संबंधित मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांचेकडून देयकावर शिफारस घेऊन तसा उल्लेख वैद्यकीय देयकाच्या प्रस्तावामध्ये/नस्तीमध्ये करण्यात यावा. तसेच वैद्यकीय देयके C.G.H.S दरानुसार लेखापरिक्षण करुन तसे देयकांवर प्रमाणीत करण्यात यावे व देयके या कार्यालयाकडे पाठविण्यात यावीत. याबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी.

सदर परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे सहमतीने प्रसारीत करण्यात येत असून परिपत्रक प्रसारीत केलेल्या दिनांकापासून लागू राहील. सदर परिपत्रक सर्व अधिकारी / कर्मचारी व मानसेवी वैद्यकीय अधिकारी यांच्या निदर्शनास येईल अशा पध्दतीने आपल्या स्तरावर कार्यवाही करावी.

(राहुल तोरो)
**महाव्यवस्थापक (क.व औ.सं )**

Scanned by CamScanner

--२--

<u>प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)



Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. २५/२०२०

क्र.राप/ कर्मवर्ग/आस्था/४८६-ई/ २४२०
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक :१० सप्टेंबर २०२०.

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- उपमहाव्यवस्थापक, नियंत्रण समिती क्र.१ - मुंबई-पुणे, नियंत्रण समिती क्र.२ - नाशिक - औरंगाबाद, नियंत्रण समिती क्र.३ - अमरावती - नागपूर
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर
- विभाग नियंत्रक, रा.प. मुंबई / पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदुर्ग / ठाणे / नाशिक / जळगांव / धुळे / अहमदनगर / पुणे / कोल्हापूर / सांगली / सातारा / सोलापूर / औरंगाबाद / बीड / जालना / लातूर / नांदेड / उस्मानाबाद / परभणी / नागपूर / भंडारा / चंद्रपूर / गडचिरोली / वर्धा / अमरावती / अकोला / बुलडाणा / यवतमाळ.

...

विषय :- अनुकंपा तत्वावर ''कनिष्ठ संगणित्र चालक'' या पदामध्ये नेमणूक देण्याबाबत.

संदर्भ :- १. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१६/२०१६,
क्र.राप / कर्मवर्ग / आस्था / ४८६-ई / ५२०१, दिनांक २५.०५.२०१६.
२. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.०७/२०१७,
क्र.राप / कर्मवर्ग / आस्था / ४८६-ई / १४२२, दिनांक १५.०३.२०१७.
३. परिपत्रक क्र.राप / कर्मवर्ग / आस्था / ४८६-ई / ६५४५, दि.१२.११.२०१८.
४. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.५१/२०१९,
क्र.राप / कर्मवर्ग / आस्था / ४८६-ई / ७५१५, दिनांक ३१.१२.२०१९.

...

उपरोक्त संदर्भित परिपत्रकांनुसार मृत कर्मचा-यांच्या अवलंबितास अनुकंपा तत्वावर तसेच सफाईगार कर्मचा-यांच्या अवलंबितास लाड - पागे समितीच्या शिफारशीनुसार, वारसा हक्क पद्धतीने त्यांच्या अवलंबितास / वारसास सद्य स्थितीत खालील पदांमध्ये नेमणूका देण्यात येतात.

१] चालक, २] वाहक, ३] सहायक, ४] शिपाई, ५] सहायक कारागीर (टायर फिटर / रबर संयोजक), ६] लिपीक - टंकलेखक, ७] स्वच्छक, ८] सफाईगार या घटकसंवर्ग - ३ मध्ये तसेच, १] लेखाकार, २] भांडारपाल, ३] वाहतूक निरीक्षक, ४] प्रभारक या राज्यसंवर्ग - ३ पदांमध्ये अनुकंपा तत्वावर नोकरी देण्यात येते.

अनुकंपा तत्वावर तसेच लाड - पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाईगार कर्मचा-यांच्या अवलंबिताना नेमणूकीसाठी प्राप्त होणा-या काही प्रकरणांमध्ये अभियांत्रिकी संगणक तसेच माहिती तंत्रज्ञान शाखेचे पदवी / पदवीकाधारक अशी उच्च शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांचे अर्ज प्राप्त होत असल्याने, अशा उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार नेमणूकीकरीता योग्य पद उपलब्ध नसल्याने, त्यांना इतर पदात काम करावे लागते. त्यामुळे, सदर उमेदवारांना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार अनुकंपा तत्वावर नोकरी देण्याबाबत मा.संचालक मंडळाने पुढीलप्रमाणे महामंडळ ठराव क्र.२०२०: ०७ : ०४, दि.२४.०७.२०२० अन्वये पारित करण्यात आला आहे.

१. रा.प.महामंडळामध्ये मृत कर्मचा-यांच्या एका अवलंबितास अनुकंपा तत्वावर व लाड - पागे समितीच्या शिफारशीनुसार सफाईगार कर्मचा-यांच्या एका वारसास त्यांच्या शैक्षणिक अर्हतेनुसार "कनिष्ठ संगणित्र चालक" या वर्ग - ३ घटकसंवर्ग पदामध्ये नेमणूक देण्यास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली आहे.

२. त्यानुसार, अनुकंपा तत्वावर व लाड - पागे समितीच्या शिफारशींप्रमाणे "वारसा" हक्कानुसार नियुक्तीकरीता "कनिष्ठ संगणित्र चालक" या पदाचा समावेश करण्यात येत आहे.

३. तसेच, वर्ग - ३ व ४ घटकसंवर्ग, व वर्ग - ३ राज्यसंवर्ग पर्यवेक्षकीय पदांमध्ये अनुकंपा तत्वावर तसेच लाड - पागे समितीच्या शिफारशीनुसार "वारसा" हक्काने नेमणूकीकरीता नविन पदाचा समावेश करणे अथवा एखादे पद वगळण्याबाबत तसेच एकूण अनुकंपा धोरणाबाबत निर्णय घेण्याचे सर्व अधिकार मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना प्रदान करण्यास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली आहे.

वरीलप्रमाणे मान्यता दिल्यामुळे, यापुढे अनुकंपा तत्वावर व लाड - पागे समितीच्या शिफारशीनुसार प्राप्त झालेल्या प्रकरणी, अभियांत्रिकी संगणक तसेच माहिती तंत्रज्ञान शाखेचे पदवी / पदवीकाधारक अशी उच्च शैक्षणिक अर्हता धारण केलेल्या उमेदवारांचे "कनिष्ठ संगणित्र चालक" या पदाकरीता अर्ज प्राप्त झाल्यास, अशा उमेदवारांना सरळसेवेच्या अटी व शर्तींनुसार "कनिष्ठ संगणित्र चालक" या घटकसंवर्ग - ३ पदात नेमणूक देण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची पोच देण्यात यावी.

(शेखर चन्ने)
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

प्रत अग्रेषितः

- मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ.) / महाव्यवस्थापक (बांधकाम) / विधी सल्लागार [वर्ग-१] / उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी / मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं) / कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन).

महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.२६ /२०२०

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ २४८५
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८
दिनांक : १०.०९.२०२०

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/ (समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र. ३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प.दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय :- नैसर्गिक आपत्तीमध्ये पिडीत झालेल्या रा.प.कर्मचा-यांना / अधिका-यांना विशेष पगारी रजा देणेबाबत.

संदर्भ :- कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक ६/१९९४ क्र.राप/आस्था/२१७-अे/१५७० दिनांक २८.०३.१९९४

दिनांक ०३ व ४ जून २०२० रोजी निसर्ग चक्रीवादळामुळे सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर, ठाणे या जिल्हयात मोठया प्रमाणात हानी होउन घराची पडझड झाली आहे. या प्रकोपामध्ये किनारपट्टीच्या गावात राहणा-या रा.प.कर्मचा-यांना विशेष रजा मंजुर करण्याबाबत मागणी करण्यात आली आहे.

यापुर्वी दिनांक ३०.०९.१९९३ रोजी लातूर व उस्मानाबाद जिल्हयात झालेल्या भुकंपामुळे तसेच २६/२७ जुलै, २००५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे बाधीत झालेल्या रा.प.कर्मचा-यांना विशेष रजा देण्यात आली होती. दिनांक माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१९मध्ये सातारा, सांगली, कोल्हापूर, तसेच इतर जिल्हयातील अतिवृष्टीमुळे पूरपरिस्थितीमुळे बाधित झालेल्या रा.प.कर्मचा-यांना परिपत्रक ४५/२०१९ क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/५६०२ दिनांक २०.०९.२०१९ अन्वये, विशेष रजा देण्यात आली होती. त्याच धर्तीवर दिनांक ०३ व ४ जून २०२० रोजी निसर्ग चक्रीवादळामुळे बाधित झालेल्या रा.प.कर्मचा-यांना / अधिका-यांना विशेष रजा देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

या परिपत्रकाद्वारे अशा सुचना देण्यात येत आहेत की, दिनांक ०३ व ४ जून २०२० रोजी निसर्ग चक्रीवादळामुळे सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड, पालघर, ठाणे या जिल्हयातील बाधित रा.प. कर्मचारी / अधिकारी यांना कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक ६/१९९४ क्र.राप/आस्था/२१७-अे/१५७० दिनांक २८.०३.१९९४ मध्ये नमुद केलेल्या सुचना, अटी व शर्तीनुसार, त्यांच्या कामगिरीची आगार / घटक निहाय वस्तुस्थितीची खातरजमा करुन विशेष रजा, विभाग व घटक पातळीवर संबधित सक्षम प्राधिकारी यांनी मंजूर करावी.

सदरचे परिपत्रक लेखा खात्याच्या सहमतीने व मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

राहुल तोरो

( राहुल तोरो )
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

..२..

D:\GAD\Circular\Gen Circular-2020.docx

Scanned with CamScanner

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/महाव्यवस्थापक ( भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) /महाव्यवस्थापक (नियोजन व पणन)/महाव्यवस्थापक (यं. अ)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ उपमहाव्यवस्थापक (बांधकाम)/मुख्य विधि अधिकारी /मुख्य कामगार अधिकारी/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/ अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी /(प्रशासन)/
(मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/(मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

Scanned with CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. २७/२०२०

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/ 2ER2
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८
दिनांक २४.०९.२०२०

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प.दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
  कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
  परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय : नैसर्गिक आपत्तीमध्ये (निसर्ग चक्रीवादळामुळे) पिडीत झालेल्या रा.प.कर्मचा-यांना ३ महिन्याचे अग्रिम वेतन बिनव्याजी देण्याबाबत.

संदर्भ : १. कामगार करार २०००-२००४ व कामगार करार २००४-२००८ परिपत्रक क्र.३/२००५ क्र.राप/आस्था/७०२जीई/३५९३ दिनांक ०५.०८.२००५
२.कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.२४/२००५ क्र.राप/आस्था/७०२जीई/४०४५दि.०३.०९.२००५
३.कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.२७/२००५ क्र.राप/आस्था/७०२जीई/४७९२ दि.२५.१०.२००५
४. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.३६/२०१९ क्र.राप/आस्था/४०८ई(१)/५१८७ दि.०७.०९.२०१९.

-------

दिनांक ३ जून व ४ जून,२०२० रोजी निसर्ग चक्रीवादळामुळे सिंधुदुर्ग,रत्नागिरी,रायगड,पालघर जिल्हयात मोठया प्रमाणात वित्त हानी झाली आहे. निसर्ग चक्रीवादळामुळे रा.प.कर्मचा-यांच्या घराचे तसेच स्थावर मालमत्तांचे मोठया प्रमाणात नुकसान झालेले असून त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अशा चक्रीवादळाने बाधित रा.प.कर्मचा-यांची माहिती सर्व विभाग/ घटक कार्यालयाकडुन मागविण्यात आली होती. त्या अनुषंगाने मुंबई विभागातील २ कर्मचारी, रत्नागिरी विभागातील १६ कर्मचारी व मध्यवर्ती कार्यालय, मुंबई येथील २ कर्मचा-यांसाठी अनुक्रमे रु.२,२०,६२९/-, रु.९,११,८५०/- व रु.१,३०,०००/- अशा एकत्रित रु.१२,६२,४७९/- एवढया रक्कमेची संबधित विभाग/ घटक कार्यालयाकडुन मागणी करण्यात आलेली आहे. अन्य विभाग/ घटकांकडून मागणी निरंक असल्याचे कळविण्यात आले आहे. परिणामस्वरुप, मुंबई, रत्नागिरी व मध्यवर्ती कार्यालय, मुंबई येथिल उक्त नमुद संख्येच्या चक्रीवादळाने बाधित रा.प.कर्मचा-यांना ३ महिन्याचे वेतन (मुळ वेतन + महागाई भत्ता) अग्रिम बिनव्याजी अदा करण्याबाबत खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१. जे रा.प.अधिकारी/कर्मचारी निसर्ग चक्रीवादळामुळे बाधित झाले असतील त्यांनी त्यांच्या विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुखांकडे अग्रिमासाठी अर्ज करावा, त्यामध्ये चक्रीवादळामुळे झालेल्या नुकसानीबाबत तपशिल नमूद करावा.

..२..

२. निसर्ग चक्रीवादळामुळे नुकसान झालेल्या रा.प.कर्मचारी/अधिका-यांनी महसूल यंत्रणे कडून (तहसिलदार किंवा नायब तहसिलदार यांच्यापेक्षा कमी दर्जाचा अधिकारी नसावा.) निसर्ग चक्रीवादळामुळे बाधित झालेल्या कुटुंबाला नुकसानीचा पंचनामा प्रमाणपत्र दिलेले असल्यास व त्या कुटुंबाचा सदस्य किंवा प्रमुख म्हणून रा.प. महामंडळातील कर्मचारी असल्यास अशा कर्मचारी/अधिका-यास बिनव्याजी अग्रिम मंजूर करण्यात यावे.

३. ज्यांना चक्रीवादळामुळे आपदग्रस्त म्हणून शासनाकडून सानुग्रह अनुदान मिळालेले आहे व या विषयाचा दाखला/प्रमाणपत्र महसूल यंत्रणेकडून संबधित रा.प.कर्मचारी/ अधिकारी यांनी सादर करावे. किंवा शासनाचा अनुदान स्विकारल्याचा अन्य पुरावा सादर करण्याच्या अटीवर बिनव्याजी अग्रिम मंजूर करावे.

४. बिनव्याजी अग्रिमाची वसुली त्यांचे वेतनातून समान ३६ सलग मासिक हप्त्यात करावे. नजीकच्या काळात सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांबाबत **हप्त्यांची संख्या सेवानिवृत्तीचा कालावधी संलग्न करुन** मासिक हप्त्यात वसूल करण्यात यावी.

सदरचे परिपत्रक हे लेखा खात्याच्या सहमतीने व मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(शैलेश चव्हाण)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं.)

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) /महाव्यवस्थापक(भां.व खु.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन) / सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/ समन्वय)/ (घटकसंवर्ग).

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.:- २८

क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४८६-ई/ २६६०
म.रा.मा.प.महामंडळ, मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई-०८.
दिनांक :२८/९/२०२०.

- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी-पुणे.
- उपमहाव्यवस्थापक नियंत्रण समिती क्र.१ [ मुंबई-पुणे ], नियंत्रण समिती क्र.२ [ नाशिक - औरंगाबाद ], नियंत्रण समिती क्र.३ [ अमरावती - नागपूर ].
- कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प. मुंबई / पालघर / रायगड / रत्नागिरी / सिंधुदूर्ग / ठाणे / नाशिक / जळगांव / धुळे / अहमदनगर / पुणे / कोल्हापूर / सांगली / सातारा / सोलापूर / औरंगाबाद / बीड / जालना / लातूर / नांदेड / उस्मानाबाद / परभणी / नागपूर / भंडारा / चंद्रपूर / गडचिरोली / वर्धा / अमरावती / अकोला / बुलडाणा / यवतमाळ.

...

**विषय :- मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत पावलेल्या आंदोलकांच्या कुटूंबातील एका अवलंबितास शैक्षणिक पात्रतेनुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात नोकरी देण्याबाबत.**

...

मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत पावलेल्या आंदोलकांच्या कुटूंबियांना पुन्हा सन्मानाने उभे करण्यासाठी, त्यांच्या कुटूंबातील एका अवलंबितास त्याच्या शैक्षणिक पात्रतेनुसार रा.प.महामंडळात नोकरी देण्याबाबतच्या प्रस्तावास मा.संचालक मंडळाच्या २९४ व्या बैठकीमध्ये मान्यता देण्यात आली असून, त्याप्रमाणे महामंडळ ठराव क्र.२०२०:०९:१५, दि.०४.०९.२०२० अन्वये पारित करण्यात आला आहे. सदर ठरावाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे सुचना प्रसारीत करण्यात येत आहेत.

१. मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत पावलेल्या आंदोलकांच्या कुटूंबियांना पुन्हा सन्मानाने उभे करण्यासाठी, कुटूंबातील एका अवलंबितास सध्याच्या अनुकंपा धोरणानुसार अनुज्ञेय असलेल्या सरळसेवा भरती प्रमाणे शैक्षणिक अर्हता, शारिरीक पात्रता व इतर अटी व शर्तीनुसार घटकसंवर्ग वर्ग - ३ व वर्ग - ४ या संवर्गामधील महामंडळाला आवश्यक त्या पदांमध्ये एकवेळची बाब म्हणून सामावून घेण्यास मा.संचालक मंडळाने मान्यता दिली आहे.

२. रा.प.महामंडळातील समावेशनानंतर पुन्हा या योजनेअंतर्गत सदर उमेदवारांस महामंडळातील अन्य पदाकरीता अर्ज करता येणार नाही. यासाठी मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत पावलेल्या कुटूंबातील एका अवलंबिताने शैक्षणिक अर्हतेनुसार पात्र ठरणा-या पदाकरीता अर्ज सादर करावा. सदर अर्जासोबत कुटूंबातील इतर अवलंबितांचे "ना हरकत प्रमाणपत्र" जोडणे आवश्यक राहील.

३. मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत पावलेल्या कुटूंबातील अवलंबित अथवा वारसदार नियुक्तीसाठी पात्र ठरत नसेल, तर अर्हता धारण केल्यापासून एक वर्षाच्या कालावधीत नियुक्तीसाठी अर्ज करण्याची मुभा देता येईल.

..२..

४. तसेच, अवलंबित / वारसदार सज्ञान नसल्यास व शिक्षण घेत असल्यास, त्याच्या वयाची २५ वर्षे पुर्ण होईपर्यंत त्याच्या नेमणूकीचा हक्क राखुन ठेवता येईल. परंतु, त्याकरीता सदर कुटूंबाने सदरचे परिपत्रक प्रसारीत झाल्यापासून ०१ वर्षाचे आत तसा अर्ज सादर करणे आवश्यक राहील.

५. उपरोक्त धोरणाबाबत योग्य तो बदल करण्याबाबतचे अधिकार मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांना राहतील.

वरीलप्रमाणे, मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान मृत पावलेल्या आंदोलकांच्या कुटूंबातील एका अवलंबिताने विभागाकडे अर्ज सादर केल्यानंतर, सदर मृत पावलेल्या आंदोलनातील व्यक्तीची शहानिशा अथवा त्यांची नावे संबंधित विभागाच्या जिल्हाधिकारी कार्यालये व जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या कार्यालयाकडून प्रमाणित करुन घेण्यात यावीत व उपरोक्त प्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सदर परिपत्रक मिळाल्याची पोच देण्यात यावी.

(शेखर चन्ने)
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

<u>प्रत माहितीस्तव अग्रेषितः</u>

- मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी / महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (वाहतूक) / महाव्यवस्थापक (नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ.) / महाव्यवस्थापक (बांधकाम) / विधी सल्लागार [वर्ग-१] / उपमहाव्यवस्थापक (मा.व तं.) / मुख्य कामगार अधिकारी / सचिव, म.रा.मा.प. महामंडळ / जनसंपर्क अधिकारी / मुख्य सांख्यिकी अधिकारी / मा.अध्यक्ष, म.रा.मा.प.महामंडळ यांचे वैयक्तिक सचिव / मा. उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव / मुख्यकर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं) / कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय / राज्यसंवर्ग / मनुष्यबळ / मागासवर्ग कक्ष / सामान्य प्रशासन).

<u>कर्मचारीवर्ग खाते</u>
<u>परिपत्रक क्र. २९/२०२०</u>

मसुदा मान्यतेकरिता

क्र.राप/कर्मवर्ग/वैप्र/ 2651
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८.
दिनांक: 03 सप्टेंबर, २०२०.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/(समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र. ३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय: वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तींच्या प्रयोजनार्थ
अवलंबित्व ठरविण्यासाठी उत्पन्नावरील मर्यादा सुधारणेबाबत.

संदर्भ: १)परिपत्रक क्र. ३/२०१३ क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/वैप्र/२०९३
दि.१६ मे २०१३.
२)महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय
<u>क्र.वैखप्र-२०१७/प्र.क्र.६१४/राकावि-२ दि.०२.०८.२०१९.</u>

संदर्भित परिपत्रकानुसार मुंबई राज्य मार्ग परिवहन कर्मचा-यांच्या सेवेसंबंधी विनियम १८८ अन्वये वैद्यकीय लाभाच्या प्रित्यर्थ 'कुटूंब ' या संज्ञेचे व्याख्या करण्यता आली आहे. त्यानुसार रा.प. कर्मचा-यांवर अवलंबून असणा-या आई-वडिलांचे दरमहा उत्पन्न रु.३५००/- पर्यंत असल्यास त्यांना कर्मचा-यांवर पूर्णपणे अवलंबून असल्याचे समजण्याची तरतूद आहे.

ही मर्यादा महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र.वैखप्र-२०१७/प्र.क्र.६१४/ राकावि-२ दि.०२.०८.२०१९ अन्वये सुधारित केलेली असून, त्यानुसार रा.प.कर्मचा-यांसाठी सुधारित तरतूद खालीलप्रमाणे लागू करण्यात येत आहे.

कर्मचा-यांच्या आई-वडीलांना १) निवृत्तीवेतन मिळत असेल किंवा २) निवृत्ती वेतन मिळत नसले तरी अन्य मार्गांनी उत्पन्न मिळत असेल किंवा ३) निवृत्तीवेतनासह अन्य मार्गांनीही उत्पन्न मिळत असेल तर अशा सर्व प्रकरणी, उपचार घेतेवेळी त्यांचे सर्व मार्गांनी मिळणारे एकूण उत्पन्न हे दरमहा रु.९०००/- इतके मूळ निवृत्तीवेतन घेणा-या सेवानिवृत्त राज्य शासकीय कर्मचा-यास मिळणा-या वित्तलब्धीच्या मर्यादेत (म्हणजे रु.९०००/- अधिक त्यावरील उपचार सुरु करण्याच्या दिनांकास अनुज्ञेय असणारी महागाई वाढ) असेल तर ते वैद्यकीय प्रतिपूर्तींच्या प्रयोजनासाठी रा.प.कर्मचा-यांवर अवलंबित असल्याचे मानले जाईल.

वरील तरतुद रा.प. कर्मचा-यांच्या अविवाहित बहिणीचे आणि घटस्फोटीत बहिणीचे त्यांच्यावरील अवलंबित्व ठरविताना तसेच महिला रा.प. कर्मचा-याने तिच्या आई/वडीलांएवजी सासू-सास-यांची निवड केली असेल तर अशा प्रकरणी सासू-सास-यांचे तिच्यावरील अवलंबित्व ठरवितानाही लागू असेल.

(शैलेंद्र चव्हाण)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं )

<u>प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.</u>
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी / विधि सल्लागार / सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

**कर्मचारीवर्ग खाते**
**परिपत्रक क्र.३०/२०२०**

क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/ २२९३
मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन,
मुंबई सेंट्रल, मुंबई-८.
दिनांक: १२ ऑक्टोबर, २०२०.

महाव्यवस्थापक (आवेदन) रा.प.प्रादेशिक कार्यालय,पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/(समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र.३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक,रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी,पुणे/ औरंगाबाद / नागपूर
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदूर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/
नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी /
नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

विषय - रा.प.महामंडळाच्या नामिकेवर असलेल्या खाजगी रुग्णालयांना CGHS च्या दराने उपचार करण्याच्या अटीवर नामिकेवरील मान्यता पुढे सुरु ठेवणेबाबत.

संदर्भ: १)परिपत्रक ९/८७ क्र.राप/कर्मवर्ग/६०१-वै/२२५८ दि.२३.०४.१९८७.
२)परिपत्रक क्र.२६/२००६ दिनांक ०१.१०.२००६.
३) परिपत्रक क्र.४०/२०१८ क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/६०१७ दि.१७.१०.२०१८.
४) परिपत्रक क्र.०३/२०२० क्र.राप/कर्मवर्ग/वैद्य/२५४ दि.१५.०१.२०२०.

------

संदर्भाधिन परिपत्रक क्र.३ व ४ अन्वये रा.प.महामंडळाच्या नामिकेवर असलेल्या रुग्णालयांना CGHS च्या दराने उपचार करण्याकरिता मान्यता पुढे सुरु ठेवण्यासंदर्भात सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच खालील नमूद रुग्णालयाने CGHS च्या दराने रा.प.नामिकेवरील मान्यता पुढे सुरु ठेवण्यासंदर्भात सहमती दर्शविल्याने सदर रुग्णालयाची मान्यता त्याचे नावासमोर दर्शविलेल्या आजारावरील उपचाराकरीता सदर परिपत्रकाच्या दिनांकापासून CGHS च्या दराने करण्याच्या अटीवर पुढे सुरु ठेवण्यात येत आहे.

| अ. क्र. | रुग्णालयाचे नांव व पत्ता | आजाराचे स्वरुप | रुग्णालय पत्र संदर्भ | CGHS च्या दरानुसार लागू असलेले दर |
|---|---|---|---|---|
| १. | के.एल.ई.एस. डॉ.प्रभाकर कोरे हॉस्पीटल,बेळगाव नेहरु नगर, बेळगाव- ५९००१०.(कर्नाटक) | हृदय उपमार्ग शस्त्रक्रिया व हृदयावरील इतर शस्त्रक्रिया | No.KLES/PKHOSP/ credit cell/19-20/10456 dt.17.02.2020. | पुणे शहराकरिता लागू असलेले दर |

कृ.मा.पा.

तसेच खालील रुग्णालयांनी CGHS च्या दराने उपचार करण्यास असहमती दर्शविल्याने सदर रुग्णालयांची नावे सदर परिपत्रकाच्या दिनांकापासून रा.प.नामिकेवरुन कमी करण्यात येत आहेत.

| अक्र | रुग्णालयाचे नांव | आजाराचे स्वरुप | नाव कमी करण्याचे कारण. |
|---|---|---|---|
| १ | कमलनयन बजाज हॉस्पीटल, औरंगाबाद | १)हृदय शस्त्रक्रिया २)बायपास शस्त्रक्रिया ३)मुत्रपिंड प्रत्यारोपण | सदर रुग्णालयाने नमूद केलेल्या आजारांवरील शस्त्रक्रियेसाठी **CGHS** च्या दराने उपचार करण्यास **असहमती दर्शविल्याने** नमूद **आजाराकरीता रुग्णालयाचे रा.प. नामिकेवर असलेले नाव कमी करण्यात येत आहे.** |
| | | **टिपः-** सदर रुग्णालय फक्त **अॅन्जीओप्लास्टी शस्त्रक्रियेसाठी CGHS** च्या दराने उपचार करण्यास **सहमत असल्याने** कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.०३/२० पत्र क्र.२५४,२५५ दि.१५.०१.२०२० नुसार **अॅन्जीओप्लास्टी शस्त्रक्रियेसाठी रा.प. नामिकेवरील सदर रुग्णालयाची मान्यता पुढे सुरु ठेवण्यात येत आहे.** | |
| २ | शेठ नंदलाल धुत रुग्णालय, औरंगाबाद | कर्करोग | सदर रुग्णालयाने नमूद आजारावरील उपचाराकरीता **CGHS** च्या दराने उपचार करण्यास **असहमती दर्शविल्याने रा.प. नामिकेवरुन नाव कमी करण्यात येत आहे.** |

सदर परिपत्रक वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांचे सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

(शैलेंद्र चव्हाण)
**महाव्यवस्थापक (क.व औ.सं)**

<u>प्रत: माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व प.)/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक / मुख्य कामगार अधिकारी/ विधि सल्लागार / सचिव,म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी /मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(सेवामंडळ)/मा.अध्यक्षांचे स्वीय सहाय्यक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सामान्य प्रशासन )सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्यसंवर्ग) / (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटकसंवर्ग) / (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

**कर्मचारीवर्ग खाते**
**परिपत्रक क्र. ३९/२०२०**

क्र.राप/कर्मवर्ग/प्रशा/ २८९८
रा.प.मध्यवर्ती कार्यालय,
महाराष्ट्र वाहतूक भवन, डॉ.आनंदराव नायर मार्ग,
मुंबई सेंट्रल, मुंबई-४००००८.
दिनांक : १४ ऑक्टोबर, २०२०

महाव्यवस्थापक (अपील) रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
उप महाव्यवस्थापक (प्रशिक्षण) रा.प.मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे
उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/(समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक)/
(समिती क्र. ३- नागपूर व अमरावती).
कार्यशाळा व्यवस्थापक, रा.प.मध्यवर्ती कार्यशाळा, दापोडी, पुणे/ औरंगाबाद / नागपूर.
विभाग नियंत्रक, रा.प.विभागीय कार्यालय,
मुंबई /ठाणे /पालघर /रायगड/ रत्नागिरी /सिंधुदुर्ग /पुणे/ सातारा/ सांगली/ कोल्हापूर/ सोलापूर/ नाशिक /जळगांव /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /जालना /लातूर/ बीड /उस्मानाबाद /परभणी/ नांदेड/अमरावती /अकोला /बुलडाणा /यवतमाळ /नागपूर /वर्धा /भंडारा /चंद्रपूर/गडचिरोली.

**विषय: विभाग नियंत्रक यांनी बडतर्फ केलेल्या तृतीय श्रेणी कर्मचा-यांच्या अपिलाबाबत.**

-------

शिस्त व आवेदन कार्यपध्दतीमधील खंड ६(१) व अनुसूची 'अ' कलम १८ चा अवलंब करुन, मद्यपान केल्याचे तपासणीत सिध्द झालेल्या चालकांना बडतर्फ केल्याची कारवाई बहुतांश विभागांमार्फत करण्यात आल्याचे दिसून येते. तथापि अशा प्रकारच्या कारवाईमध्ये खालील त्रुटी आढळून आल्या आहेत.

१. शिस्त व आवेदन कार्यपध्दतीमधील खंड ६ (१) अन्वये दोषी आढळल्यास कोणतीही चौकशी न करता शिक्षा देण्याची तरतूद आहे. परंतु अशा प्रकारे शिक्षा देताना अपचारी कर्मचाऱ्यास नैसर्गिक न्याय तत्वानुसार कारणे दाखवा नोटीस न देता शिक्षा द्यावी असे नमूद केलेले नाही. तथापि, वर नमूद कारवाई करताना अपचाऱ्यास कारणे दाखवा नोटीस न देता बडतर्फ केल्याचे दिसून येते.

२. विभाग नियंत्रक यांनी अशा प्रकारच्या अपराध प्रकरणी बडतर्फीच्या आदेशामध्ये उपमहाव्यवस्थापक (सनियंत्रण समिती) यांचेकडे आदेश मिळाल्यापासून ३ महिन्यांच्या आत अपील सादर करणेबाबत नमूद केले आहे. तथापि, अशा प्रकारची कोणतीही तरतूद शिस्त व आवेदन कार्यपध्दतीमध्ये दिसून येत नाही.

३. शिस्त व आवेदन कार्यपध्दतीमधील खंड ६ (१) व अनुसूची 'अ' कलम १८ चा अवलंब करुन विभाग नियंत्रक यांनी चालकांना बडतर्फ केल्याने संबंधित चालक प्रथम आवेदनाच्या संधीपासून वंचित राहिल्याचे दिसून येते.

त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१. शिस्त व आवेदन कार्यपध्दतीमधील खंड ६ (१) व अनुसूची 'अ' कलम १८ चा वापर करुन अशा प्रकारे कारवाई करताना संबंधित कर्मचाऱ्याला नैसर्गिक न्याय तत्वानुसार कारणे दाखवा नोटीस देणे आवश्यक आहे.

कृ.मा.प

२. ज्या प्रकरणांमध्ये शिस्त व आवेदन कार्यपध्दती खंड ६ (१) व अनुसूची 'अ' कलम १८ चा अवलंब करुन, मद्यपान केल्याचे तपासणीत सिध्द झालेल्या चालकांना /अपचाऱ्यास बडतर्फ करण्यात आलेले आहे व अशा चालकांना/अपचाऱ्याला देण्यात आलेल्या बडतर्फीच्या अंतिम आदेशामध्ये 'अपील सादर करावयाचे असल्यास, उपमहाव्यवस्थापक (सनियंत्रण समिती) यांचेकडे हा आदेश मिळाल्यापासून ३ महिन्यांचे आत सादर करता येईल', अशी तरतूद नमूद केलेली आहे. असे प्रलंबित अपिल प्रथम अपिल समजण्यात येऊन अशा प्रकरणी संबंधित उपमहाव्यवस्थापक (सनियंत्रण समिती) हे प्रथम अपिलीय अधिकारी राहतील व अशा अपचाऱ्यांचे द्वितीय अपिलीय प्राधिकारी, द्वितीय अपिलीय समिती, पुणे हे राहतील.

३.सदर तरतूद एक वेळची बाब म्हणून, सदर परिपत्रक निर्गमित केलेल्या दिनांका पर्यंत विषयांकीत प्रकरणी घडलेल्या अपराध प्रकरणांमध्येच लागू राहील.

सदर सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

( शैलेंद्र चव्हाण )
**महाव्यवस्थापक (क.व औ.सं)**

प्रत: <u>माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना.</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ महाव्यवस्थापक (वाहतूक)/ महाव्यवस्थापक (भां.व ख.)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (नि.व.प.)/ महाव्यवस्थापक (बांधकाम) / उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य स्थापत्य अभियंता/ मुख्य अंतर्गत लेखापरीक्षक/मुख्य कामगार अधिकारी /विधि सल्लागार/सचिव, म.रा.मा.प.महामंडळ / मुख्य सांख्यिकी अधिकारी / जनसंपर्क अधिकारी / मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (सेवामंडळ) / मा.अध्यक्षांचे स्वीय सहायक/ उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे स्वीय सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी (सामान्य प्रशासन )सहायक कर्मचारीवर्ग अधिकारी (राज्य संवर्ग)/ (मुख्यालय) / (मनुष्यबळ) (घटक संवर्ग)/ (प्रशासन)/ सामान्य प्रशासन)/ (मावक)

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र. ३२/२०२०

क्रमांक:राप/आस्था/४०८-ई(१)/३२४१
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ४००००८
दिनांक : ३१.१०.२०२०

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक)/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प.दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय :- रा.प.कर्मचा-यांची उपस्थिती १०० टक्के करणेबाबत.

संदर्भ : १. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/१५६१ दि.२०.०३.२०२०

२. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.१७/२०२० क्र.राप/आस्था/४०८-ई(१)/ १७८० दिनांक १९.०६.२०२०

-------

महाराष्ट्र शासन,गृह परिवहन विभाग यांचे पत्र क्र.एसटीसी-०७२०/प्र.क्र.२८७/परि-१ दि.१७.०९.२०२० अन्वये, कर्नाटक व गुजरात राज्याच्या १०० टक्के प्रवाशी वाहतुक सुरु करावयाच्या धर्तीवर रा.प.महामंडळाच्या बसेसद्वारा अटी व शर्तींच्या अधिन पुर्ण आसन क्षमतेने प्रवाशी वाहतुक करण्यास शासनाने मंजूरी दिली आहे.

राज्य शासनाकडून पुन:श्च प्रारंभ अभियान अंतर्गत, टप्प्याटप्प्याने निर्बंध शिथिल करण्यात येत आहेत. रा.प.महामंडळाची सेवा ही सार्वजनिक उपयुक्तता सेवा असल्याने व राज्य शासनाने पुर्ण क्षमतेने प्रवाशी वाहतुक करण्यास रा.प.महामंडळास परवानगी दिल्याने राज्यातील प्रवाशी जनतेस रा.प. बसद्वारे प्रवाशी सेवा सक्षमपणे उपलब्ध करुन देण्यासाठी सर्व कर्मचाऱ्यांची कार्यालयीन कामकाज पुर्ण क्षमतेने सुरु करण्यासाठी कार्यालयात १०० टक्के उपस्थितीबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

१. लॉकडाऊन होण्यापुर्वी रा.प.महामंडळातील अधिकारी / कर्मचारी यांची रा.प.महामंडळात उपस्थिती होती, त्याचप्रमाणे यापुढे सर्व कर्मचारी/अधिकारी यांची उपस्थिती १०० टक्के अनिवार्य असेल.

२. प्रकरणपरत्वे, अनुपस्थित राहणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्याबाबत सक्षम प्राधिकारी यांनी नियमाधिन कार्यवाही करावी.

३. सदरच्या सुचना परिपत्रक प्रसारित झाल्याच्या दुस-या दिवसापासून अंमलात येतील.

सदरचे परिपत्रक हे मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने व लेखा खात्याच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

या परिपत्रकातील सुचना सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी विभाग/ घटक प्रमुखांची आहे.

(स्वाक्षरी) ३१/१०
(मिलिंद्र बंधाण)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) /महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन) / सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/ समन्वय)/ (घटकसंवर्ग).

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.३३/२०२०

क्रमांक:राप/कर्मवर्ग/आस्था/४०८-ई(१)/३६९३
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ०८
दिनांक:२३.११.२०२०

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदुर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय** :- कोव्हीड-१९ संबधित कर्तव्य बजावताना कोव्हीडमुळे मृत्यु होणाऱ्या कर्मचाऱ्यांना विमा कवच/सानुग्रह सहाय्य लागु करण्यास मुदतवाढ देणेबाबत.

**संदर्भ**:- १. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र. १३/२०२०
क्रमांक:राप/कर्मवर्ग/आस्था/४०८-ई(१)/१६७१ दि.०१.०६.२०२०
२.क्रमांक:राप/कर्मवर्ग/आस्था/४०८-ई(१)/२६९६ दि.३०.०९.२०२०
३. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.संकिर्ण२०२०/प्र.क्र.४/व्यय-९ दिनांक १४ ऑक्टोबर २०२०
४.जा.क्र.राप/मुकाअ/७२३ दि.१५.०९.२०२०
५.जा.क्र.राप/मुकाअ/८४५ दि.०९.१०.२०२०

*****

रा.प.महामंडळातील परिचालनाशी संबंधीत चालक, वाहक, चालक तथा वाहक,स्थानकावरील प्रत्यक्ष प्रवाशांच्या संपर्कात येणारे वाहतुक नियंत्रक, सहा.वाहतुक निरिक्षक तसेच सुरक्षा रक्षक कर्मचाऱ्यांच्याबाबतीत अटी व शर्तीच्या अधिन राहून विमा कवच / सानुग्रह सहाय्य दि.३०.०९.२०२० पर्यंत संदर्भित परिपत्रक १ अन्वये,लागू करण्यात आले होते.

तथापि,महाराष्ट्र राज्यात सद्य:स्थितीत कोविड-१९ विषाणुची साथ चालू असल्यामुळे संदर्भाधिन शासन निर्णयानुसार,संदर्भ क्र.१ व २ येथील परिपत्रकीय सुचनांस दिनांक ०१.१०.२०२० पासून दिनांक ३१.१२.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

संदर्भित परिपत्रकातील अन्य सर्व अटी व शर्ती कायम राहतील.

(शैलेंद्र चव्हाण) २३/११
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) /महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.३८/२०२०

क्रमांक:राप/कर्मवर्ग/आस्था/४०८-ई(१)/ 3628
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय,महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग,मुंबई- ०८
दिनांक : २८/९/२०२०

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था,भोसरी,पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा),रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय :- कोविड-१९ च्या संसर्गजन्य रोगाच्या पार्श्वभूमीवर सन २०२०-२१ या आर्थिक वर्षातील बदल्यांसंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.

संदर्भ :- कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.५/२०१४ क्र.राप/आस्था/२०१-ई/२१३९ दि.०३.०५.२०१४

----

कोरोना कालावधीमध्ये महामंडळाची आर्थिक स्थिती विचारात घेता, चालू वित्तीय वर्षात कोणत्याही संवर्गातील अधिकारी /कर्मचारी यांच्या बदल्या उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेशिवाय करु नये, तसेच प्रशासकीय बदल्या करण्यात येऊ नये अशा परिपत्रकीय सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. तथापि, परिपत्रकीय सुचनांनुसार, विभाग व घटक स्तरावरुन विविध संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांच्या बदल्यांबाबतचे प्रस्ताव उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेस्तव सादर करण्यात येत असल्याने बदल्यांबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहे.

१. महामंडळाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता,कोरोना पार्श्वभूमीवर या आर्थिक वर्षात (सन २०२०- २०२१) प्रशासकीय बदल्या करण्यात येऊ नयेत.

२. कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.५/२०१४,क्र.राप/आस्था/२०१-ई/२१३९ दि.०३.०५.२०१४ अन्वये,म.रा.मा.प.अधिकारी व कर्मचारी यांचे बदल्याचे विनियम व अधिनियम तरतुदी विचारात घेऊन विनंती बदली बाबत कार्यवाही करण्यात यावी.

३. कर्मचारीवर्ग खाते, परिपत्रक क्र.१४/२०२०,क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४०८-ई(१)/१७०७ दिनांक ०९.०६.२०२० व कर्मचारीवर्ग खाते परिपत्रक क्र.२१/२०२०, क्र.राप/कर्मवर्ग/आस्था/४०८-ई(१)/२१६२ दिनांक ०५.०८.२०२०अन्वये,दिलेल्या सुचना रद्द करण्यात येत आहेत.

सदर परिपत्रक मा.उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्या मान्यतेने प्रसारीत करण्यात येत आहे.

(शैलेंद्र चव्हाण)
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

..२..

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) /महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.३५ /२०२०

क्रमांक:राप/कर्मवर्ग/आस्था/४०८-ई(१)/३८९७
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ०८
दिनांक : २६.११.२०२०

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र.१-मुंबई व पुणे)/ (समिती क्र.२-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र.३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
  मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/ कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/ परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

विषय :- वेतन तारखांबाबत.
संदर्भ :- क्र.राप/लेखा/सा.१/१७८९ दिनांक २६.११.२०२०

----

रा.प.महामंडळातील प्रशासकीय कर्मचा-यांचे वेतन १ तारखेस होते व आगार व कार्यशाळेतील कर्मचा-यांचे वेतन ५/७ तारखेस होते. तथापि, यापुढे रा.प.महामंडळातील सर्व अधिकारी व कर्मचा-यांच्या वेतनाबाबत खालीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत.

२. रा.प.महामंडळातील सर्व अधिकारी व कर्मचा-यांच्या वेतनाच्या तारखेमध्ये एकवाक्यता राहण्याकरिता सर्व अधिकारी व कर्मचा-यांच्या वेतनाची तारीख प्रत्येक महिन्याची ७ तारीख निश्चित करण्यात येत आहे.

३. असे वेतन अदा झाल्यावर वैधानिक वसुल्या असे की, आयकर, व्यवसाय कर, पेन्शन इ. त्या त्या प्राधिकरणाकडे वर्ग करण्याबाबत व परतावे दाखल करण्याबाबत त्या त्या घटकांकडून आवश्यक दक्षता घेण्यात यावी.

सदरचे परिपत्रक लेखा खात्याच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

(शेखर चन्ने)
उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक

<u>प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :</u>
मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी/ वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/ विधी सल्लागार (वर्ग-१) / महाव्यवस्थापक(भां.व ख.)/ महाव्यवस्थापक(वाहतूक)/ महाव्यवस्थापक(नियोजन व पणन)/ महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान)/ मुख्य कामगार अधिकारी/ जनसंपर्क अधिकारी/ मुख्य सांख्यिकी अधिकारी/ मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/ मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी(से.मं.)/ अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव/ कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/ (मुख्यालय)/(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग)/(मनुष्यबळ नियोजन / समन्वय) /(घटकसंवर्ग).

Scanned by CamScanner

कर्मचारीवर्ग खाते
परिपत्रक क्र.- ३६/२०२०

क्रमांक:राप/कर्मवर्ग/आस्था/४०८-ई(१)/ 82606
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ,
मध्यवर्ती कार्यालय, महाराष्ट्र वाहतूक भवन,
डॉ.आनंदराव नायर मार्ग, मुंबई- ०८
दिनांक : १६.१२.२०२०

- महाव्यवस्थापक (आवेदन), रा.प.प्रादेशिक कार्यालय, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (प्रशिक्षण), रा.प. मध्यवर्ती प्रशिक्षण संस्था, भोसरी, पुणे.
- उपमहाव्यवस्थापक (समिती क्र. १-मुंबई व पुणे)/ (समिती क्र. २-औरंगाबाद व नाशिक )/ (समिती क्र. ३-नागपूर व अमरावती)
- कार्यशाळा व्यवस्थापक (मध्यवर्ती कार्यशाळा), रा.प. दापोडी, पुणे /औरंगाबाद/नागपूर.
- विभाग नियंत्रक, रा.प.महामंडळ,
मुंबई/पालघर/रायगड/रत्नागिरी/सिंधुदूर्ग/ठाणे/नाशिक/जळगांव/धुळे/अहमदनगर/पुणे/
कोल्हापूर/सांगली/सातारा/सोलापूर/औरंगाबाद/बीड/जालना/लातूर/नांदेड/उस्मानाबाद/
परभणी/नागपूर/भंडारा/चंद्रपूर/वर्धा/अमरावती/अकोला/बुलडाणा/यवतमाळ/गडचिरोली.

**विषय:-** सर्व रा.प.कार्यालयामध्ये काम करणा-या नियमित तसेच कंत्राटी स्वरुपातील अधिकारी / कर्मचारी /सल्लागार यांचेसाठी कार्यालयात परिधान करावयाच्या पोशाखा संदर्भात (ड्रेस कोड) मागदर्शक सुचना.

******

उपरोक्त विषयांकित शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.७१/१८ (र.व का.) दिनांक ०८ डिसेंबर, २०२०ची प्रत माहीतीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडली आहे.

रा.प.महामंडळातील सर्व कार्यालयामध्ये काम करणा-या अधिकारी व कर्मचारी (ज्या सर्व संवर्गातील कर्मचा-यांना विविध रा.प.परिपत्रकान्वये, गणवेश नेमून देण्यात आले आहेत, असे रा.प.कर्मचारी वगळता ) यांचा कार्यालयातील दैंनदिन पेहराव कशा प्रकारचा असावा याबाबतच्या शासन परिपत्रकातील सुचना, सर्व घटक/विभाग प्रमुखांनी आपल्या कार्यालयाच्या सुचना फलकावर ठळकपणे प्रदर्शित कराव्यात. त्याचप्रमाणे आपल्या अधिनस्त असणा-या सर्व नियमित तसेच कंत्राटी स्वरूपातील अधिकारी / कर्मचारी यांच्या निदर्शनास आणाव्यात.

(शैलेंद्र चव्हाण) १६/१२
महाव्यवस्थापक (क.व औ.सं)

सोबत - वरीलप्रमाणे.

प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सादर रवाना :

मुख्य सुरक्षा व दक्षता अधिकारी / वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी/विधी सल्लागार (वर्ग-१) /महाव्यवस्थापक(भां.व ख.)/महाव्यवस्थापक(वाहतूक)/महाव्यवस्थापक(नियोजन व पणन) / महाव्यवस्थापक (यं.अ)/ महाव्यवस्थापक (बांधकाम)/ सचिव, म.रा.मा.प. महामंडळ/ उपमहाव्यवस्थापक (माहिती व तंत्रज्ञान) / मुख्य कामगार अधिकारी/ /जनसंपर्क अधिकारी/मुख्य सांख्यिकी अधिकारी/मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (मुख्यालय)/मुख्य कर्मचारीवर्ग अधिकारी (से.मं.)/अध्यक्षांचे वैयक्तिक सचिव / उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांचे वैयक्तिक सचिव /कर्मचारीवर्ग अधिकारी(सा.प्रशासन)/ सहाय्यक कर्मचारीवर्ग अधिकारी (सा.प्रशासन)/(प्रशासन)/ (मुख्यालय) /(राज्यसंवर्ग)/ (मागासवर्ग) / (मनुष्यबळ नियोजन/समन्वय)/(घटकसंवर्ग).

D:\GAD\Circular\Gen Circular-2020.docx

**सर्व शासकीय कार्यालयांमध्ये काम करणाऱ्या नियमित तसेच कंत्राटी स्वरुपातील अधिकारी/ कर्मचारी/ सल्लागार यांच्यासाठी कार्यालयात परिधान करावयाच्या पोशाखा संदर्भात (ड्रेस कोड) मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-२०२०/प्र.क्र.७१/१८(र.वका.)**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार), मुंबई ४०००३२
दिनांक : ८ डिसेंबर, २०२०

**<u>शासन परिपत्रक</u>:-**

महाराष्ट्र शासनांतर्गत मंत्रालय तसेच मंत्रालयाच्या अधिनस्त सर्व प्रकारची राज्य शासकीय कार्यालये येथून राज्य शासनाचा कार्यभार चालविण्यात येतो. ही सर्व कार्यालये राज्य शासनाचे जनमानसातील प्रतिनिधी म्हणून पाहण्यात येतात. या कार्यालयांमध्ये राज्यभरातील मा.खासदार, मा.आमदार/नगरसेवक इ. लोकप्रतिनिधी, सर्वसामान्य नागरिक, अन्य खाजगी संस्थांचे/ आस्थापनांचे प्रतिनिधी/उच्चपदस्थ अधिकारी इत्यादी त्यांच्या कामासाठी भेट देत असतात. मंत्रालय तसेच सर्व राज्य शासकीय कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी हे कार्यालयास भेट देणाऱ्या संबंधितांशी शासनाचे प्रतिनिधी म्हणून सुसंवाद साधतात. अशा वेळी राज्य शासनाचे प्रतिनिधी म्हणून राज्य शासकीय कार्यालयातील सर्व प्रकारचे अधिकारी/कर्मचारी यांची वेशभूषा हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा अत्यंत महत्वाचा भाग म्हणून पाहिला जातो. संबंधितांच्या वेशभूषेवरुनच ते कार्यरत असलेल्या आस्थापनेची एक विशिष्ट छाप भेट देणाऱ्या अभ्यांगतांवर पडते. त्यामुळे शासकीय कार्यालयात काम करीत असताना कार्यालयातील सर्वच अधिकारी व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या एकूण व्यक्तीमत्वाबद्दल तसेच वेशभूषेबद्दल जागरुक राहून आपली वेशभूषा ही शासकीय कार्यालयास किमान अनुरुप ठरेल याची सर्वकष काळजी घेणे अभिप्रेत आहे.

